महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ. क्र. | मुद्दा | माहिती |
| 1. | 8 | श्री. मोहम्मद जमाल | १ | नागपूर महानगरपालिकाने पटवर्धन मैदान की जगह के लीज के नुतणीकरण करने के संदर्भ अभि तक कोण–कोणशी कार्यावाही की गई उस संदर्भ में कागदपत्र के साथ शिलशिलेवार माहिती के संदर्भ मे उत्तर दिया जाये! | मौजा धंतोली येथिल खसरा क्र. ५/२, ६ व ७ मधील १३.५६ एकर जागा (पटवर्धन मैदान) बाबतची माहीती पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे:<br>१. शासन परिपत्रक दि. ६ एप्रील १९६२ अन्वये मौजा धंतोली येथिल खसरा क्र. ५/२, ६ व ७ मधील १३.५६ एकर जागा रू. १/— नाममात्र दरावर १५ वर्षाकरीता मल्टीपरपज स्टेडीयम करीता महानगरपालिकेस भाडेपट्ट्यावर मिळाली होती. याची मुदत दि. ०६.०४.१९७७ ला संपलेली आहे.<br>२. दि. १५.०४.१९७७ चे पत्रानुसार महानगरपालिकेने सचिव, महसुल व वन विभाग यांना पत्राद्वारे नुतनिकरणाबाबत विनंती केली आहे.<br>३. दि. ०९.०६.१९९३ चे पत्रान्वये सचिव, नगर विकास विभाग यांना जागेचे नुतनिकरणाबाबत विनंती केली आहे.<br>४. दि. १२.१२.२००२ चे पत्रानुसार नुतनिकरण का करण्यात आले नाही याबाबत नझुल विभागास विचारणा केली आहे.<br>५. अवर सचिव, नगर विकास विभाग यांचे दि. २०.०७.१९९३ चे पत्रानुसार नुतनिकरणाबाबत जिल्हाधिकारी तसेच महसुल व वन विभाग यांचकडे संपर्क साधण्याचे कळविले.<br>६. दि.०५.०८.१९९३ चे पत्रानुसार जिल्हाधिकारी यांना भाडेपट्ट्याचे नुतनिकरणाबाबत विनंती केली आहे व त्याची प्रत शासनास सुध्दा सादर केली आहे.<br>७. या विभागाचे दि. ०७.०९.१९९३ चे पत्रानुसार नझुल अधिकारी, नागपूर यांना नुतनिकरणाबाबत पुन:श्च विनंती करण्यात आली.<br>८. शासनाचे महसुल व वन विभागाचे दि. २७.०८.१९९३ चे पत्रानुसार या प्रकरणाबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडून मागविला. सदर अहवाल सादर करण्याबाबत महानगरपालिकेने जिल्हाधिकारी यांना सुध्दा कळविले आहे.<br>९. नझुल अधिकारी यांचे दि. ०५.१२.२००२चे पत्रान्वये जागा वापराचे प्रयोजनाची माहीती मागीतली व नुतनिकरण का करण्यात आले नाही, जागा वापराचे परवानगीबाबत माहीती शासनास कळविण्यास्तव अपेक्षिलेली होती. त्यानुसार विभागाद्वारे दि. १२.१२.२००२ चे पत्रान्वये सविस्तर अहवाल नझुल अधिकारी तथा शासनास पाठविण्यात आला.<br>१०. दि. ०४.१२.२००४, ०३.०१.२००४ चे पत्रान्वये विभागाने जागेच्या भाडेपट्ट्याचे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | नुतनिकरणाबाबत विनंती केली.<br>११. दि. २०.१०.२००५ चे पत्रान्वये शासनास नुतनिकरण करण्याचे प्रस्तावाची प्रत पाठविण्यात आली.<br>१२. दि. ३०.०८.२०१० चे पत्रान्वये नुतनिकरणाबाबत अपर मुख्य सचिव यांना विनंती करण्यात आली.<br>१३. दि. ०६.०४.२०११ चे पत्रान्वये नुतनिकरण्याबाबत जिल्हाधिकारी यांना पुन:श्च विनंती करण्यात आली.<br>१४. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त दि. ३१.०३.२०११ चे पत्रानुसार अटि व शर्थीचा भंग केल्यामुळे लिज रद्द का करण्यात येउ नये या पत्राचे अनुषंगाने कार्यालयाने दि. ०७.०७.२०११ चे पत्रानुसार सविस्तर खुलासा सादर करून नुतनिकरणाबाबत विनंती केली आहे.<br>१५. दि.०८.०१.२०१३ व २५.११.२०१३ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी यांना नुतनिकरणाबाबत विनंती केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने दि. १४.०२.२०१४ चे पत्रानुसार शासनास नुतनिकरणाबाबतचा प्रस्ताव सादर केल्याचे महानगरपालिकेस कळविले. तद्नंतर प्रधान सचिव, महसुल व वन विभाग यांना दि.३०.०३.२०१५ व ०६.०५.२०१५ चे पत्रान्वये नुतनिकरणाबाबत विनंती करण्यात आली. तथापि या संदर्भात शासनास केलेल्या पाठपुराव्याचे अनुषंगाने दि. ०३.०७.२०१६ रोजी मा. मुख्यमंत्री कार्यालय, नागपूर येथे आयोजीत आढावा सभेमध्ये संबंधित जागेचा विकास करण्याचे दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोध केंद्र व उर्वरीत जागेचा आराखडा तयार करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले.<br>१६. जागेच्या भाडेपट्ट्याचे नुतनिकरण व फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करण्यास महानगरपालिकेने दि. ०१.१२.२०१६ रोजी ठराव क्र. ३७९ अन्वये मंजूरी प्रदान असुन दि. ०६.०४.२०१७ चे पत्रान्वये शासनास विनंती करण्यात आलेली आहे.<br>१७. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने या जागेचा एकत्रित आराखडा तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे सुरू असुन आरसखड्यातील नमुद वापरानुसार जागेच्या फेरबदलाबाबतची व नुतनिकरणाची मंजुरी शासनाकडून अपेक्षित आहे. |

हस्ता/- निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 2. | 9 | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | (खालील तक्ता पहा) |

| अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | नागपूर महानगरपालिकेतील ग्रंथालय अधिक्षक या पदाकरिता नियमावली नुसार शैक्षणिक पात्रता कोणत्या प्रकाराने देण्यात आली आहे. तसेच या पदाकरिता नियुक्ती पुर्वी अनुभवाचा कालावधी किती आहे. सध्या कार्यरत ग्रंथालय अधिक्षक यांची शैक्षणिक पात्रता काय आहे ? व ते किती वर्षापासून या पदावर कार्यरत आहे. | म.न.पा. पारीत ठराव क्र. 31, दि. 12/04/1976 अन्वये ग्रंथपाल हया पदाकरिता शैक्षणिक पात्रता पदवीधर व लायब्ररी सायन्स मधील डीग्री किंवा डिप्लोमा तसेच ग्रंथपाल हया पदाचे तीन वर्षाचे अनुभव आवश्यक व ही जागा जाहिरातीव्दारे भरण्यात येईल अशी तरतूद आहे.<br>म.न.पा. ठराव क्र. 116, दि. 31/10/1996 नुसार – म.न.पा. ठराव क्र. 138, दि. 20/12/1995 अन्वये महापौरजी यांना दिलेल्या अधिकारान्वये गठीत केलेल्या समितीचा अहवालानुसार खालील प्रमाणे एकमताने निर्णय घेतला –<br>1) ग्रंथपाल व अधिक्षक, ग्रंथालय व अध्ययन कक्ष या दोन्ही पदाकरिता महानगरपालिका ठराव क्र 31, दि. 12/04/1976 अन्वये पदो भरण्यासाठी असलेली तरतूद रद्द करून या पदाकरिता ज्या कर्मचा–यांजवळ शैक्षणिक पात्रता व अर्हता आहे, अशा ग्रंथालय व अध्ययन कक्ष विभागातील कर्मचा–यांना सेवाजेष्ठता व योग्यतानुसार, पदोन्नती देण्यात यावी.<br>म.न.पा. ठराव क्र. 128, दि. 02/12/1997 मधील उपसूचना क्र. 2 अन्वये ग्रंथालय व अध्ययन कक्ष विभागातील अधिक्षक हे पद रिक्त असल्याने व या पदाचा कार्यभार श्री. हरीश नवलकिशोर दुबे हे समर्थपणे सांभाळीत असल्याने श्री. हरीश दुबे यांना अधिक्षक, ग्रंथालय व अध्ययन कक्ष या पदावर नियमितपणे पदोन्नती देणेस एकमताने मंजुरी प्रदान करण्यात आली. व त्यानुसार श्री. हरीश दुबे, सहा. ग्रंथपाल यांना कार्यालयीन आदेश क्र. 171/ओ. ॲन्ड एम. दि. 16/09/1998 अन्वये ग्रंथालय अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आली व तेव्हापासून श्री. दुबे हे ग्रंथालय अधिक्षक या पदावर साधारणतः 19 वर्षे कार्यरत होते. श्री. हरीश दुबे यांची शैक्षणिक पात्रता– B.COM., Certificate Course पद LIB.Science, M.A.(Eco.) अशी आहे.<br>म.न.पा. ठराव क्र. 396, दि. 31/12/2016 अन्वये श्री. एच. एन. दुबे यांना आदेश क्र. 19/ओ. ॲन्ड एम. दि. 25/04/2017 अन्वये निगम सचिव या पदावर पदोन्नती देण्यात आली.<br>आदेश क्र. 79/ओ. ॲन्ड एम. दि. 07/06/2017 अन्वये श्री. पारस शर्मा, सहा. ग्रंथपाल यांना अधिक्षक ग्रंथालय विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. श्री. पारस शर्मा (सध्या कार्यरत ग्रंथालय अधिक्षक) यांची शैक्षणिक पात्रता – B.Com, B.Lib. अशी आहे. |

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 3. | 10 | सौ. आशा नेहरु उईके (आयेशा) | |

| अ. क्र. | मुदद्ा | माहिती |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 08 येथील मोमीनपुरा, भानखेडा, अंसारनगर, तकिया गोळीबार चौक व दादरा पुल टोपरे विहीर या भागात बहमंजिल इमारतींचे जाळे असुन या इमारतीचे बांधकाम विभागाकडून मंजुर नकाशा प्रमाणे करण्यात आले आहे का ? किंवा ज्या इमारतीचे बांधकाम अवैधरित्या करण्यात आले आहे त्या इमारत मालकांवर संबंधित विभागाने कारवाई केली आहे का किंवा कसे ? | प्रभाग क्र. 08 येथील मोमीनपुरा, भानखेडा, अंसारनगर, तकिया गोळीबार चौक व दादरा पूल टोपरे विहिर या भागात बहुमंजिल इमारतींचे जाळे आहे हे खरे आहे. या भागातील अर्जदारांनी सादर केलेल्या प्रस्तवित बांधकामाच्या नकाशांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच ज्या इमारत मालकांने मंजुरी विरुद्ध अवैध बांधकाम केले आहे. अशा बांधकामांकर विभागातर्फे नोटीस कार्यवाही करण्यात आली आहे. |
| 2 | सन 2000 ते 2016 या कालावधीत ज्या इमारतीचे बांधकाम अवैधरित्या करण्यात आले आहे त्या इमारत मालकास विभागाकडून कायेदेशिर नोटीस देण्यात आले आहे का ? व विभागाकडून देण्यात आलेल्या नोटीस प्रमाणे कार्यवाही करण्यात आली का ? असे अवैध बांधकाम असलेल्या एकूण किती इमारती आहेत याची सविस्तर माहिती मला देण्यात यावी. | होय,<br>सन 2000 ते 2016 या कालावधीत मंजुरी विरुद्ध व अवैधरित्या बांधकाम झालेल्या इमारत मालकांना खालील प्रमाणे नोटीस देण्यात आले आहे.?<br>1) MR & TP Act 1966 अंतर्गत कलम 53(1) व 54 अन्वये<br>एकूण = 79<br>2) 3 झेड (1) अंतर्गत एकूण = 15<br>3) कलम 286 अंतर्गत एकूण = 14<br>एकूण प्रकरणे = 108<br>उपरोक्त प्रकरणांची यादी संलग्न आहे. |

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्रमांक</th><th>मा. सदस्यांचे नांव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>4.</td><td>11</td><td>श्री. मनोज दशरथ सांगोळे</td><td>
<table>
<tr><th>कमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>१)</td><td>मृतक रोजंदारी ऐवजदार कर्मचा—यांच्या नातेवाईकांची भरती का होत नाही?</td><td>नियमानुसार अनुज्ञेय नसल्यामुळे.</td></tr>
<tr><td>२)</td><td>तसेच रोजंदारी ऐवजदार कर्मचारी यांना स्थायी कां करण्यात येत नाही?</td><td>सध्यास्थितीत आवश्यक पदांना शासन मंजूरी प्राप्त झालेली नसल्यामुळे रोजंदारी ऐवजदार कर्मचा—यांना सेवेत स्थायी नियुक्ती देता येत नाही.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

हस्ता/— निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 5. | 12 | श्री. प्रदीप वसंतराव पोहाणे | (खालील तक्त्याप्रमाणे) |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | मलेरिया, फायलेरिया या विभागातर्फे कोणत्या पध्दतीचे कामे करण्यात येते, याची माहिती देण्यात यावी. | मलेरिया, फायलेरिया हे विभागातर्फे खालीलप्रमाणे कार्य केल्या जाते.<br>• रात्रो सर्वेक्षण करून हत्तीरोग रूग्ण शोधणे.<br>• किटकजन्य आजाराबद्दल (उदा. डेंग्यु, चिकुनगुण्या, हिवताप, हत्तीरोग इत्यादी) जनतेमध्ये जनजागृती करीता मायकिंग करणे, हस्तपत्रके वाटून जनजागृती करून लोक प्रशिक्षण देण्यात येते.<br>मलेरिया विभागामार्फत प्रभागा–प्रभागामध्ये सर्वेक्षण करून हिवताप रूग्ण शोधून आढळलेल्या रूग्णाचा औषधोपचार करणे. (RT)<br>• अळीनाशक फवारणी करणे.<br>• हिवताप कर्मचाऱ्यामार्फत डेंग्यु, चिकुनगुण्या सारख्या किटकजन्य आजारावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे.<br>• जैविक कार्यक्रम अंतर्गत विहिरीमध्ये, मोठया डबक्यांमध्ये गप्पीमासे सोडण्यात येतात.<br>• बाहयलक्षणेयुक्त रूग्णांची तपासणी करून उपचार करणे.<br>• वेगवेगळया सार्वजनिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन किटकजन्य आजाराबाबत जनतेला माहिती देणे. |
| २ | मलेरिया, फायलेरिया या विभागातर्फे लकडगंज झोनमध्ये किती माणसे देण्यात आलेली आहे व त्यांची कामे कोणत्या प्रकारची आहे. | लकडगंज झोनमध्ये ०१ हत्तीरोग निरीक्षक, ०१ वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी, हिवताप कर्मचारी ०२ व १६ क्षेत्र कर्मचारी असुन एवढे मनुष्यबळ आहे ते फवारणीचे काम, घरोघरी हाऊस ब्रिडींगचे कामे करतात. |
| ३ | शहरामध्ये फॉगींग मशीन किती आहेत व या मशीनवर किती खर्च करण्यात येतो. | मनपा कडे शहराकरीता ०२ व्हेयीकल मांऊटेड मशीन असुन एका धुरफवारणी मशीन करीता एका दिवसाचा प्रत्येकी रू.१०,९२०/– खर्च येतो, १५ दिवसाकरीता रू.१,६३,८००/– व ०४ महिन्याकरीता रू.६,९५,२००/– ऐवढा खर्च येतो.<br>तसेच १० नग हॅन्ड फॉगींग मशीन सर्व उपपथकाला देण्यात आलेली आहे. त्याकरीता एका हॅन्ड फॉगींग मशीन करीता एका दिवसाचा प्रत्येकी रू.९२४/– खर्च येतो, १५ दिवसाकरीता रू.१३,८६०/– व ०४ महिन्याकरीता रू.५५,४४०/– ऐवढा खर्च येतो. विभागाने पुन्हा ०३ व्हेयीकल माऊंटेड फॉगींग मशीनचा प्रस्ताव सादर केलेला आहे. |
| ४ | एका प्रभागात फॉगींग मशीन नगरसेवकांनी सांगीतल्या नंतर किती दिवसानंतर यायला पाहिजे. | मा.नगरसेवकांच्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार तत्परतेने फॉगींग मशीन आळीपाळीने (Rotetion) पाठविण्याची व्यवस्था करण्यात येते. |
| ५ | एका प्रभागात फवारणीकरीता किती प्रमाणात औषध उपलब्ध करून देण्यात येतो व फवारणी करण्याचा वेळ किती ते किती राहतो. | एका प्रभागामध्ये एक क्षेत्र कर्मचाऱ्याला १० एम.एल. अबेट, १० लिटर एम.एल.ओ.आईल, १०० एम.एल. बी.टी. आय.लिक्वीड फवारणी कर्मचाऱ्याला देण्यात येते.<br>वेळ सकाळी ०७.०० ते ०२.०० पर्यंत असुन या वेळेत ०१ क्षेत्र कर्मचारी ०२ फेऱ्याची फवारणी करून घरगुती डासोत्पत्ती स्थानांची तपासणी करतो. |

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 6. | 13 | ॲड. श्री. धर्मपाल मेश्राम | (खालील तक्त्याप्रमाणे) |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | करमशील हाईट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पोस्ट ऑफिस जवळ, नागपूर हया निवासी इमारतीतील फ्लॅट क्र. १०१ व १०२ हया निवासी गाळयात डॉ. भावतकर हयांचे सोनोग्राफी व फिजीओ थेरेपी केंद्र सुरु आहे, हे खरे आहे काय? | हे खरे आहे. |
| २ | सहाय्यक संचालक, नगररचना, म.न.पा. हयांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये हया दोन्ही फ्लॅटचे नियमबाहय वापर सुरु असुन, सहा. आयुक्त, आसीनगर झोन नं. ९ ला योग्य कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले होते व सहा. आयुक्त, आसीनगर झोन नं. ९ हयांनी दि. ०१/०२/२०१६ ला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) नुसार आवश्यक असलेल्या परवानगी शिवाय हया इमारतीचा अनधिकृत वापर थांबविण्याचे आदेश दिले व त्याची अंमलबजावणी न झाल्यास फौजदारी कार्यवाही करण्याचे आदेशित केले.<br>या सोनोग्राफी व फिजिओथेरेपी केंद्राविरुध्द रहिवाशी इमारतीतील इतर गाळेधारकांनी आरोग्य उपसंचालक व आरोग्य अधिकारी (दवाखाने) हयांच्याकडे अनेकदरा तक्रारी केल्या तत्कालीन उपसंचालक व आरोग्य अधिकारी (दवाखाने) हयांनी मा. आयुक्त, म.न.पा. हयांच्या निदर्शनास "न" आणुन देता आपल्याच स्तरावर वेळोवेळी हे प्रकरण चालवुन केंद्र सुरुच रहावे यासाठी | डॉ. भावतकर यांचे सोनोग्राफी केंद्राबाबत या सदनिकेतील रहिवाशी श्री. रविंद्र गजभिये यांनी नागपूर महानगरपालिका व अन्य यांचे विरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असता सहा. आयुक्त, आसीनगर झोन यांनी दि. ०१/०२/२०१६ ला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) नुसार केलेल्या नोटीस कार्यवाहीबाबत मा. उच्च न्यायालयाने डॉ. भावतकर यांचे बाजुने निकाल देऊन दि. १६/०३/२०१६ चे आदेशान्वये कार्यालयाची नोटीस खारीज केली. (लोककर्म विभागाचे स्वतंत्र उत्तर संलग्न आहे)<br><br>तथापी प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तत्कालीन उपसंचालक व आरोग्य अधिकारी यांनी पीसीपीएनडीटी नोडल अधिकारी यांचेसमक्ष सोनोग्राफी केंद्रास आकस्मिक भेट देऊन तपासणी केली असता १) विद्यमान कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले नाही. २) एमएमसी कायद्यातील कलम ३७६ अंतर्गत नमुद उपद्रव सदृश्य परिस्थिती दिसून आलेली नाही. (सविस्तर तपासणी अहवाल टिपणीत नमुद आहे) ३) सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात दाखल रिट पिटीशन नं. ६३९/२०१६ बाबत आदेश दि. १६/०३/२०१६ चे अनुषंगाने सदर व्यवसाय बंद करणे उचित राहिल किंवा कसे याबाबत मनपाचे कायदेविषयक सल्लागार यांचे अभिमत घेण्यात आले. (सविस्तर अभिमत टिपणीत नमुद आहे)<br><br>उपरोक्त बाबी विचारात घेता समुचित प्राधिकरणाकडे सदर केंद्र बंद करण्याबाबत कुठलेही ठोस कारण नसल्याने ते कायदेशिरपणे बंद करणे शक्य नाही. त्यामुळे सदर सोनोग्राफी केंद्राच्या संचालकांना संरक्षण देण्यात आले, हे खरे नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | सर्वतोपरी प्रयत्न केले. महाराष्ट्र म.न.पा. अधिनियम २०१२ अंतर्गत कलम ३७६, पोट कलम (१)ड (२) मध्ये विनिर्दीष्ट तरतुदीनुसार "कोणताही व्यवसाय जो जिवीतास किंवा आरोग्य किंवा मालमत्तेस घातक असले किंवा त्यामुळे उपद्रव होण्याचा संभव असेल ते बंद करण्याचा मा. आयुक्तांना अधिकार आहे व आपले कायदेविषयक सल्लागार ॲड. एस. एस. नंदनवार यांनी आपले अभिमत हया फाईलवर नोंदवलेले असतांना देखील तत्कालीन आरोग्य उपसंचालक व आरोग्य अधिकारी (दवाखाने) हयांनी हेतुपरस्पर मा. आयुक्तांकडे हे प्रकरण न पाठवता आपल्या स्तरावर चौकशीचे गु—हाळ चालवले व हे सोनोग्राफी केंद्राचा संचालकांना संरक्षण दिले हे खरे आहे की नाही? | | |
| ३ | दि. ३० जुलै २०१४ ला सोनोलाईन भावतकर डायग्नोस्टीक केंद्राला ५०४१ क्रमांकाचे तात्पुरते नोंदणी पत्र दिले. दि. ३१ मार्च २०१७ पर्यंत त्यांची मुदत होती व ती आज तारखेला संपलेली आहे व हे नोंदणी प्रमाणपत्र आता निरस्त झाले. मग आता आपण हया विनापरवानगी व विना लायसन्स चालणा—या हया केंद्रा विरुध्द आपण आज तारखेला काय कार्यवाही केली व नियमबाहय कामे करणा—या हया अधिका—यांवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे? व हया सोनोग्राफी केंद्रा विरुध्द काय कार्यवाही करणार आहे? | सोनोग्राफी केंद्राचा व्यवसाय बाहयरुग्ण (OPD) तत्वावर चालविण्यात येत असल्याने अश्या व्यवसायाकरीता महाराष्ट्र राज्यात अद्याप स्वतंत्र कायदा प्रस्थापित नसल्याने अशा ओ.पी.डी. व्यवसायाची मनपा अंतर्गत नोंदणी केली जात नाही. परंतु अहर्ताप्राप्त वैद्यकीय व्यवसायिक वैधानिक परिषदेद्वारे नोंदणीकृत आहे. (Registered Under Indian Medical Council or Maharashtra Medical Council) अश्या डॉक्टरचा ओ.पी.डी. व्यवसाय बंद करण्याचे अधिकार आरोग्य विभागास नाही. किंबहुना आरोग्य विभागाचे सामान्य माहितीकरीता अशा व्यवसायाचे निर्धारीत शुल्क आकारुन ऐच्छिक नामांकन केल्या जाते.<br>भावतकर सोनोग्राफी क्लिनिक पीसीपीएनडीटी कायद्यातंर्गत नोंदणी क्र. २६१, दि. ८/०१/२०१२ अन्वये दि. २५/०३/२०१३ ते २४/०३/२०१८ करीता विहित नोंदणीकृत असल्याने समुचित प्राधिकरणाद्वारे कायदेशिर उल्लंघनाशिवाय कार्यवाही करणे न्यायोचित नाही.<br>तथापी संबंधीत व्यवसायाकरीता ओ.पी.डी. क्लिनिक नामांकन अर्ज विभागाला दि. ३०/०३/२०१७ रोजी प्राप्त झालेला असुन निर्धारीत शुल्क वसुलीचे अधिन दि. ३१ मार्च २०२० पर्यंतचे नामांकन सन २०१७—१८ च्या प्रक्रियेत आहे. | |

निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 7. | 14 | श्री. विजय (पिंटू शंकरराव झलके) | |

| अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | नागपूर शहरात जागोजागी मोठया प्रमाणात अवैध बाजार पेठ लागत असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. महानगरपालिकेचे रस्ते खराब होतात यामुळे स्थानिक नागरीकांना त्रास सहण करावा लागतो. | प्रश्न विचारलेला नाही परंतू उपस्थितीत केलेल्या मुद्दयाबाबत माहिती देण्यात येते कि, महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम 1949 चे कलम 327 नुसार संबोधण्यात आलेल्या नगरपालिका बाजारा ची जबाबदारी बाजार विभाग व संबंधीत झोन कार्यालयाची आहे. शहरातील अवैध बाजार पेठांवर अतिक्रमण विभाग व बाजार विभाग तर्फे संयुक्त कार्यवाही करण्यात येते. अवैध पारंपारीक व स्वाभाविक बाजारातील विक्रेत्यांना महाराष्ट्र पथविक्रेता नियम 2016 च्या तरतूदी अन्वये शहर पथविक्रेता समिती गठीत करून सदरहु समितीच्या निर्णयान्वये फेरीवाला व्यवसायीक संबोधून फेरीवाला झोन उपलब्ध करून देण्यात येतील जेणे करून वाहतुकीस अडथडा निर्माण होणार नाही व महानगरपालिकेचे रस्ते खराब होणार नाहीत व स्थानिक नागरीकांना त्रास करूण घ्यावा लागणार नाही. |
| 2 | अवैध बाजारामुळे केर–कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता महानगरपालिकेत अतिरिक्त बोझा सहण करावा लागत आहे. | अवैध बाजारांमुळे नागपूर शहरातील रस्त्यावर पडलेला केर–कचरा दररोज आरोग्य विभागाव्दारे उचलण्यात येत असून दररोज रस्त्यांची साफ–सफाई करण्यात येते व जमा झालेल्या केर–कचऱ्याची विल्हेवाट भांडेवाडी डम्पींग वार्ड येथे लावण्यात येते. याकरीता महानगरपालिकेवर येणारा अतिरिक्त आर्थीक बोझा वसूल होणे हेतू महाराष्ट्र पथविक्रेता नियम–2016 अन्वये गठीत पथविक्रेता समीती कडुन निर्णय प्राप्त करवून घेवून अशा अवैध बाजारात व्यवसाय करणारे व्यवसायीकांना राष्ट्रीय फेरीवाला धोरण–2014 अंतर्गत नोंदणीकृत करून घेवून पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना–2017 तील बाब क्र. 4.2 अन्वये व्यवसायीकां कडून मासिक विक्री शुल्क वसूल करण्यात येईल. तसेच घनकचरा व्यवस्थापन अधिनियम–2016 अन्वये बाजारातील, फेरीवाला झोन क्षेत्रातिल निर्माण होणारा घनकचऱ्याचे विल्हेवाट लावण्याबाबत संबंधीत बाजारातील बाजार निरीक्षक व संबंधीत स्वच्छता निरीक्षक यांना परिपत्रक क्र 188 दि. 19.06.2017 अन्वये जबाबदारी देण्यात आलेली आहे. |
| 3 | अवैध बाजार रोकण्या करीता तसेच हॉकर्स झोनच्या संदर्भात म.न.पा.चे धोरण. | महाराष्ट्र पथविक्रेता नियम 2016 अन्वये शहर पथविक्रेता समिती गठीत करणेची प्रक्रिया सुरू आहे. पथविक्रेता समीतीच्या रचनेनुसार पथविक्रेता सवर्गातून घ्यावयाच्या 8 प्रतिनिधी निवड होणेकरीता मा. कामगार आयुक्त यांना अर्धशासकिय पत्र देवून निवडणूक घेणेबाबत विनंती केलेली आहे. परंतू तत्पूर्वी शासन निर्णय क्र. राफेधो–2013/प्र.क्र.39/नवि–34 दि. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 21 / 10 / 2013 अन्वये शहर फेरीवाला समिती स्थापन करण्यात आलेली होती. व पथविक्रेता अधिनियम–2014 च्या तरतुदी अन्वये शहर फेरीवाला समिती व्दारे बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार महानगरपालिका सिमेत फेरीवाला क्षेत्र घोषीत करून नोंदणीकृत फेरीवाला व्यवसायीकांना घोषीत फेरीवाला क्षेत्रात जागेचे आवंटन प्रक्रिया सुरू करण्यात आली होती परंतू मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ व्दारे न्यायालयीन प्रकरण क्र. 6213 / 2016 करीता दि. 30 / 01 / 2017 रोजी मध्ये आदेश पारीत करून कार्यरत शहर फेरीवाला समिती व समितीनी घेतलेल्या निर्णयावर जैसे–थे चे आदेश पारीत केल्याने प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सध्यास्थितीत राष्ट्रीय फेरीवाला धोरण –2014 च्या अनुषंगाने फेरीवाला क्षेत्र घोषीत करणे ,फेरीवाला व्यवसायीकांच्या नोंदणीची कार्यवाही व नोंदणीकृत फेरीवाला व्यवसायीकास घोषीत फेरीवाला क्षेत्रात जागा आवंटनाची कार्यवाही सध्यास्थितीत बंद आहे. |
| | | | 4 | शहरात विविध जागी म.न.पा. व्दारे अधिकृत बाजार निर्मीती करीता D. P. मध्ये जागेचे आरक्षण करणे तसेच त्या दृष्टीने त्याचे नियोजन करणे. | सहा.संचालक नगर रचना विभागाकडुन प्राप्त माहिती नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे तरदुदीनुसार नागपूर शहराकरीता तयार करण्यात आलेली सुधारीत विकास योजना महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस–2496–2643–सी. आर.–300 (ए)–97–यु.डी.–9 दि.07 / 01 / 2000 व टिपीएस–2400–1628–सी.आर.–200–2000 युडी–9 दि. 10 / 09 / 2001 नुसार मंजुर करण्यात आलेली आहे.<br>नागपूर शहराची सुधारीत विकास योजना तयार करतांना विद्यमान बाजारांची संख्या व क्षेत्रफळ, स्थान लक्षात घेवून विकास योजनेत नविन बाजारांकरीता आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे याची यादी सोबत संलग्न करून देण्यात येत आहे. |
| | | | 5 | शहरात विविध जागी म.न.पा. व्दारे अधिकृत बाजार किती व कुठे आहे याचा संपुर्ण तपशिल तसेच प्रस्तावित बाजाराची यादी. | शहरातील विविध जागी महानगरपालिकेचे अधिकृत बाजाराची यादी सोबत टांचण केलेली आहे. तसेच विकास योजनेत नविन बाजारांकरीता आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे याची यादी सुध्दा संलग्न करून देण्यात येत आहे. |
| | | | 6 | शहराची वाढती लोकसंख्या व विस्तारी करण लक्षात घेता किती बाजार असणे आवश्यक आहे. | प्राप्त माहिती नुसार, सन 1979 च्या शासन परिपत्रकानुसार planning standard प्रमाणे 10000 लोकसंख्या करीता 0.2 हे.आर. (2000.00 चौ.मी.) क्षेत्रफळाचे प्रमाणात वेज–मार्केट करीता विकास योजनेत जागा ठेवण्याचे प्रावधान आहे. |

हस्ता / – निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गंत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 8. | 15 | श्रीमती हर्षला मनोज साबळे | |

| अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | मागील दोन वर्षात कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, उप अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली असल्यामुळे कनिष्ठ अभियंता या पदांच्या जागा रिक्त झालेल्या आहे. तसेच बरेचसे कनिष्ठ अभियंता मागील 2–3 वर्षात म.न.पा.च्या सेवेतुन सेवानिवृत्त झालेले आहे. सध्या नागपूर शहरात ब–याच प्रमाणात विकासाची कामे सुरू असुन या कामाचा अतिरीक्त भार सध्या कार्यरत कनिष्ठ अभियंतावर येत असुन स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती दिल्यास कामाचा भार योग्य रित्या क्पेजतपइनजम करता येईल. व त्यामुळे कामाची गुणवत्ता राखणे सोयीचे होईल. | मागील 2–3 वर्षात म.न.पा.तील सेवानिवृत्त व पदोन्नतीमुळे निर्माण झालेल्या रिक्त पदांपैकी पदोन्नतीच्या पदावर स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक या पदावर कार्यरत कर्मचा–यांमधुन सेवाजेष्ठता व योग्यतेनुसार कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देण्याची प्रक्रिया सुरू असुन रितसर आरक्षण स्थिती मागवून पूढील प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| 2 | नागपूर महानगरपालिकेत स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांना त्यांचे काम सांभाळुन कनिष्ठ अभियंता या पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे स्था.अ.स. याना दोन्ही कार्यभार सांभाळतेवेळी त्योच कार्यशैलीवर विपरीत परिणाम होत आहे. या कारणाने शासन निर्णयानुसार स्था. अ. स. यांना नियमित पदोन्नती देण्यात यावी व कनिष्ठ अभियंता या पदाचा अतिरीक्त कार्यभार संपूष्टात आणावा. | नागपूर महानगरपालिकेतील स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांना त्यांचे काम सांभाळुन कनिष्ठ अभियंता या पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.<br>कनिष्ठ अभियंता या रिक्त पदाचा स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकांना अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावरील पदोन्नतीची प्रक्रिया सुध्दा सुरू आहे. कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती झाल्यावर कनिष्ठ अभियंता या पदाचा सोपविण्यात आलेला अतिरीक्त कार्यभार आपोआप संपूष्टता येईल. |
| 3 | सन 2003 मध्ये नियुक्त करण्यात आलेले स्थापत्य अभि. सहा. यांना सध्या 12 वर्षाची कालबध्द पदोन्नती प्रकरणे वेतनश्रेणी लागु झालेली असल्यामुळे स्थापत्य अभि. सहा. यांना कनिष्ठ अभियंता म्हणून पदोन्नती दिल्यास म.न.पा.वर कुठलाही आर्थीक बोझा पडणार नाही. | सन 2003 मध्ये नियुक्त झालेल्या स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकांपैकी एकुण 66 पात्र स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकांना 12 वर्ष कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेला आहे. स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकांना 12 वर्षाचा लाभ दिलेला असल्याने ज्या पात्र कर्मचा–यांना कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती देण्यात येईल त्यामुळे त्यांचे वेतनाचा म. न.पा. वर कुठलाही अतिरीक्त आर्थीक भार पडणार ही वस्तुस्थिती आहे. |

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 9. | 16 | श्री. बंटी बाबा शेळके | |

| अ.क्र. | विचारलेला प्रष्न | उत्तर |
|---|---|---|
| 01 | नागपूर महानगरपालिकेत आपण नवनियुक्त निगम आयुक्त म्हणून एप्रिल 2017 झाले असून नागपूर शहरातील म.न.पा. कडून देण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधेत (आरोग्य, शिक्षण, पाणी वितरण प्रणाली व रस्ते) यात कोणकोणते परिवर्तन करणार आहात? याबाबत आपली भुमिका स्पष्ट करावी. | 1) नागपूर शहरातील म.न.पा. कडून देण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधेत विभागनिहाय खालील प्रमाणे परिवर्तन करणे नियोजित आहे.<br>अ) आरोग्य विभाग – आरोग्य शहरात स्वच्छतेचा दर्जा सुधरविणे, शहर हागणदारी मुक्त करणे व घरोघरुन संकलीत करण्यात येणारा कचरा विलगीकरण करुन ओला व सुखा कचरा वेगवेगळा संकलीत करणे.<br>भांडेवाडी परिसरात वर्ष 1963 पासून जमा झालेले Soild Waste ची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावणे.<br>ब) शिक्षण विभाग– नागपूर मनपा अंतर्गत असणाऱ्या संपूर्ण शाळा डिजीटल करणे सुरु असुन यापैकी आतापर्यंत 40 मनपा शाळा डिजीटल करण्यात आले आहेत. विद्यार्थीनीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून एकूण 22 शाळामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आले असून आवश्यकतेनुसार इतर शाळामध्येही सदर योजना राबविण्यात येत आहे.<br>मागील शैक्षणिक सत्रात नागपूर मनपाच्या पाच शाळांचे आय.एस..ओ. प्रमाणीकरण करण्यात आलेले असून पुढे देखील इतर शाळांचे आय.एस.ओ. प्रमाणीकरण करण्याचा मानस आहे.<br><br>क) पाणी वितरण प्रणाली – नागपूर शहरात 24/7 पाणी पुरवठा योजना व अमृत योजना एकंदरीत 2 वर्षात पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे.<br>ड) रस्ते – Phase –1 व Phase – 2 अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते वर्ष 2017 – 18 मध्ये पूर्ण करण्याचा व Phase – 3 अंतर्गत मंजूर कामे या वर्षी सुरु करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. |
| 02 | सन 2000 मध्ये आय.आर.डी.पी.योजने अंतर्गत नागपूर शहरात रस्त्यांचे विस्तारण करतेवेळी रस्त्याच्या कडेला | सन 2000 मध्ये आय.आर.डी.पी. योजने अंतर्गत नागपूर शहरात रस्त्याचे विस्तारण करतेवेळी रस्त्याच्या कडेला पावसाळी पाणी वाहून जाण्याकरिता तयार केलेल्या काही नाल्या पूर्णपणे बुजल्या आहे व काही नाल्या कचऱ्यानी अवरुध्द झाल्या आहेत, हे खरे आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ज्या पावसाळी पाणी वाहून जाण्याकरीता नाल्या तयार करण्यात आल्या. त्यातील काही नाल्या पूर्णपणे बुजल्या असून काही नाल्या कचऱ्याने अवरुध्द झाल्या आहेत. त्या केव्हा साफ होणार असून याबाबत प्रशासनाची काय जबाबदारी आहे? | यापैकी कचऱ्यानी अवरुध्द झालेल्या नाल्या शक्य त्या ठिकाणी साफ करण्यात आल्या असून पूर्णपणे बुजलेल्या नाल्या साफ करण्याचे दृष्टीने सर्व झोनला या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासून प्राकलने सादर करणेबाबत सुचीत केले आहे. नागपूर शहरातील संपूर्ण आय.आर.डी.पी. नाल्यांची 100 टक्के सफाई करण्याचे दृष्टीने, या सर्व प्राप्त होणाऱ्या प्राकलनांचे एकत्रित आकलन करुन मंजुरीची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. ही सर्व कामे माहे आक्टोंबर 2017 मध्ये सुरु करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. |
| | | | 03 | जर शहरातील नाल्याच स्वच्छ झाल्या नाही तर स्मार्ट सिटी कशी होणार ? नागपूर स्मार्ट सिटी या योजनेचा उलगडा करण्यात यावा? | स्मार्ट शहराच्या नाल्या स्वच्छ असाव्यात या सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी प्रशासन सहमत आहे. नागपूर स्मार्ट सिटी प्रपोजल nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे. |

हस्ता/- निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

महानगरपालिका सर्वसाधारण सभा

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 10. | 17 | श्री. तानाजी वनवे | |

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ०१ | नंदनवन घरकुल येथील तळघर बुजविण्याकरीता मा. तत्कालीन महापौर प्रविणजी दटके यांनी सभागृहात रूलिंग दिल्यानंतर यावर काय कार्यवाही करण्यात आली. | दि. २८.०३.२०१५ रोजी मा. सभापती ना.सु.प्र व मा. आयुक्त म.न.पा. यांनी प्रत्यक्ष मौका पाहणी केली. मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने मा. सभापती, ना.सु.प्र. यांना पत्र क्र. ३००/टी.आर. दि. २७.०४.२०१५ अन्वये याबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.<br>नंदनवन घरकुल योजना ना.सु.प्र.ची असल्याने व इमारतीची देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी ना.सु.प्र. ची असल्याने सदर्हु काम ना.सु.प्र. कडून होणे अपेक्षित आहे. |
| ०२ | प्रभागात गेल्या ३ वर्षापासून येणारे घाण पाणी त्वरीत बंद करणे. श्रीनगर, कव्लारू गाळे, सद्भावनानगर, हसनबाग, किर्तीनगर, नंदनवन, ८८ एम.आय.जी. येथे घाण पाण्यामुळे कावीळ या रोगाने नागरीक त्रस्त आहे, यावर उपाययोजना केव्हा करणार? | श्रीनगर:- या भागातील दुषीत पाणी निवारणार्थ ११० मी.मी. व्यासाची HDPE व अंदाजे २०० मिटर लांबीची वितरण जलवाहिनी बदलविण्याच्या प्रस्तावास दि. ०९.०६.२०१७ रोजी मंजुरी प्रदान केली आहे व ऑपरेटर मे. ओ.सि.डब्लु.पि.एल ला यांना त्वरीत कामे सुरू करण्यास्तव सुचीत करण्यात आले आहे.<br>कव्लारू गाळे, सद्भावना नगर, हसनबाग, ८८ MIG कॉलनी या भागातील संभावीत दुषीत पाणी असलेली जलवाहिन्या बदलवून त्यावर या भागातील घरगुती नळ कनेक्शन स्थलांतरीत करण्यात आले आहे, त्यामुळे दुषित पाण्याच्या तक्रारीचे निराकरण झाले आहे.<br>किर्ती नगर:- या भागातील सिव्हर लाईन चेंबरच्या बाजुने गेलेल्या जलवाहिन्यांवर असलेल्या गळत्या शोधून बंद करण्यात आल्या आहे, त्यामुळे दुषीत पाण्याचे तक्रारींचे निराकरण झाले आहे.<br>नंदनवन:- या भागात Capex अंतर्गत इंटरकनेक्शनची कामे, घरगुती नळजोडण्यांची कामे इत्यादी दररोज होत असलेल्या कामांमुळे माती मिश्रीत पाण्याच्या तक्रारी होत्या. सद्या हा भागातील Capex ची कामे पूर्ण झालेली असून येथील घाण पाण्याच्या तक्रारींचे निराकरण झाले आहे. |
| ०३ | नागपूर शहरातील मुख्य जलवाहिनीची गळती किती दिवसात बंद होईल तसेच या गळतीमुळे मोठ्या प्रमाणात वाहत असलेल्या पाण्यामूळे होत असलेली हानीस जबाबदार अधिकारी कोण? या अधिकाऱ्यावर काय कार्यवाही केली जाणार? | मुख्य जलवाहिनीवरील गळत्या आढळल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्याचे शक्यतोवर ४८ तासांमध्ये दुरूस्ती करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. सद्यस्थितीत मुख्य जलवाहिन्यांवरील गळती बाबत तक्रार प्रलंबित नाहीत. गळती विहीत वेळेत दुरूस्त न झाल्यास त्याची जबाबदारी OCWPL यांची असून गळतीमुळे वाया गेलेल्या पाण्याची त्यांचेकडून नुकसान भरपाई करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. |
| ०४ | भांडेवाडी येथे कचरा डंपींग यार्ड असून हा डंपीग यार्ड स्थानांतरित कधी होणार ? | भाडेवाडी येथील कचरा डंम्पिग यार्ड स्थानांवर बाबत कोणताही धोरणात्मक निर्णय झालेला नाही. मनपा ठराव क्र. १०५ दिनांक १२.०४.२०१३ अन्वये मेट्रो भागातील जमिन अधिग्रहण करण्याची कार्यवाही नासुप्रच्या मदतीने नगररचना विभागामार्फत करावयाची आहे. |

हस्ता/– निगम आयुक्त<br>
महानगरपालिका, नागपूर

egkuxjikfydk lolk/kkj.k lHkk ¼fo"k; if=doj u ?ksrysys iz'u½

fnukad 20@06@2017

# dk;kZy; ukxiwj egkuxjikfydk] ukxiwj

( सचिवालय )

egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;ekrhy dye 44 vUrxZr ek- lnL;kuh iz'kklukdMs fopkjysys iz'u [kkyhy iek.ks uen vlwu R;kpk xks"kokjk iq<hy iek.ks-

| v-Ø- | iz'u Øekad | ek- lnL;kps uko | vuq- Ø- | fopkjysyh ekfgrh @iz'u | mRrj |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1 | श्री. संजय मधुकरराव महाकाळकर | 1 | नागपूर शहरात SRA अंतर्गत सुरु असलेल्या सेवादल नगर, सक्करदरा येथील घरकुलांचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे असल्याबाबत नागरीकांच्या वारंवार तक्रारी येत होत्या. घरकुलाचा बांधकामाची कालमर्यादा काय होती व किती घरकुलाचे काम पूर्ण करण्यात आली व उर्वरीत घरकुलाचे बांधकामाची सद्यस्थिती काय ? तसेच घरकुलाचा बांधकामाचा निकृष्ठ दर्जा बाबत व या कामाषी संबंधित दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली याबाबत सविस्तर उत्तर देण्यात यावे. | बीएसयुपी योजनेअंतर्गत सेवादल नगर या वस्तीत 430 घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. घरकुलांचे बांधकाम मंजूर नकाषा व स्पेसीफीकेषन नुसार करण्यात आले असुन त्या बांधकामावर प्रकल्प सल्लागार यांचे अभियंता, कंत्राटी साईट अभियंता व विभागाचे अभियंता याची नियमित देखरेख होती.<br>➢ घरकुलाच्या बांधकामाची भौतिक कालमर्यादा दि. 31/12/2016 पर्यंत व प्रकल्प पूर्णत्वाची कालमर्यादा दि. 31/03/2017 पर्यंत होती.<br>➢ या वस्तीत एकूण 430 घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.<br>➢ घरकुल बांधकामाच्या दर्जा बाबत तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष मौका निरीक्षण करुन चौकषी करण्यात आली त्यानुसार बांधकामाबाबत असलेल्या त्रृटीची दुरुस्ती करण्यास कंत्राटदराला निर्देष दिले तसेच ज्या बांधकामाच्या Item मध्ये त्रृटी आढळल्या त्या Item चे Reduce Rate करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून ती रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल. |

gLrk@& fuxe vk;qDr
egkuxjikfydk] ukxiwj

egkuxjikfydk lo'lk/kkj.k lHkk ¼fo"k; if=dkoj u ?krysys i'u½

fnukd 20@06@2017

# dk;kZy; ukxiqj egkuxjikfydk] ukxiqj

## ( सचिवालय )

egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;ekrhy dye 44 vUrxZr ek- lnL;kauh i'kklukdMs fopkjysY;k iz'u [kkyhy izek.ks uen vlwu R;kpk xks"kokjk iq<hy izek.ks-

<table>
<tr><th>v-Ø-</th><th>i'u Øekd</th><th>ek- lnL;kps uko</th><th>i'ukps mRrj</th></tr>
<tr><td>2.</td><td>2</td><td>सौ. भावना संतोष लोणारे</td><td>
<table>
<tr><th>v-Ø-</th><th>i'u</th><th>mRrj</th></tr>
<tr><td>1</td><td>एस.आर.ए स्कीम अंतर्गत श्रावस्तीनगर येथे 180 घरकुल मंजूर झाले होते. या मंजूर घरापैकी किती घरे बांधण्यात आले आहे ?</td><td>केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम–बीएसयुपी योजने अंतर्गत श्रावस्तीनगर येथे 180 घरकुलाचा प्रकल्प दि. 23 मार्च 2012 च्या सीएसएमसी बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात 75 व दुसऱ्या टप्प्यात 43 घरकुले असे एकूण 118 घरकुले बांधण्यात आली आहेत.</td></tr>
<tr><td>2</td><td>एस.आर.ए स्कीम ही योजना पुर्ण झाली की सुरु आहे ?</td><td>केंद्र शासनाने ही योजना जेएनएनयुआरएम–बीएसयुपी अंतर्गत मंजूर केलेली होती, ही योजना बंद झालेली आहे. या योजने अंतर्गत मंजूर झालेले प्रकल्प दि. 31/12/2016 पुर्वी पुर्ण करण्यात यावेत, अषा सुचना डायरेक्टर (NBO), राष्ट्रीय भवन निर्माण संघटन, भारत सरकार यांचे अर्धषासकीय पत्र क्र. J-15011/1/2016/NBO दि. 02.09.2016 च्या पत्रानुसार प्राप्त आहेत. या योजनेतील काही लाभार्थीची नावे उषीरा प्राप्त झालेली होती. त्यांच्या पात्रतेची प्रक्रिया सप्टेंबर 2016 मध्ये मंजूर झाली. या लाभार्थीचा जाहीरनामा काढणेबाबत कार्यवाही सुरु केलेली होती. तथापि त्याच दरम्यान उपरोक्त पत्र प्राप्त झाल्यामुळे व ही कामे 3 महीने कालावधीत पुर्ण करणे शक्य नसल्यामुळे, उर्वरीत बांधकामे वगळण्यात आली.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

gLrk@& fuxe vk;qDr
egkuxjikfydk] ukxiqj

egkuxjikfydk loZlk/kkj.k lHkk ¼fo"k; if=dkoj u ?krysys iz'u½

fnukad 20@06@2017

# dk;kZy; ukxiqj egkuxjikfydk] ukxiqj

## ( सचिवालय )

egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;ekrhy dye 44 vUrxZr ek- lnL;kuh iz'kklukdMs fopkjysY;k iz'u [kkyhy izek.ks uewn vlwu R;kpk xks"kokjk iq<hy izek.ks-

<table>
<tr><th>v-Ø-</th><th>iz'u Øekad</th><th>ek- lnL;kps uko</th><th>iz'ukps mRrj</th></tr>
<tr><td>3.</td><td>3</td><td>श्री. मनोज दशरथ सांगोळे</td><td>
<table>
<tr><th>कमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>१)</td><td>शहर सफाई करीता ओला कचरा व कोरडा कचरा घेण्याकरीता जे डस्टबिन वाटप करणार आहात, ते विकत कोण घेणार व त्यांचे वाटपाचे नियोजन कसे होणार?</td><td>डस्टबिन विकत घेण्याची व त्याचे वाटपाची कार्यवाही मनपातर्फे होणार आहे.</td></tr>
<tr><td>२)</td><td>या प्रयोजनातून नागपूर शहर स्वच्छ व सुंदर होईल का?</td><td>घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये कच—याचे निर्मीतीच्याच ठिकणी ओला—सुका असे वर्गीकरण करणे अपेक्षित आहे. केद्रीय नगर विकास विभागाचे पत्र दि. २१/०३/२०१७ अन्वये अशाच सूचना देण्यात आल्या आहेत.<br>कच—याचे वर्गीकरणामुळे त्याची वाहतूक व प्रक्रीया दोन्ही साठी सुलभ होईल परिणामी शहर स्वच्छ व सुंदर करण्यास मदत होईल.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

gLrk@& fuxe vk;qDr
egkuxjikfydk] ukxiqj

महानगरपालिका सर्वसाधारण सभा (विषय पत्रिकेवर न घेतलेले प्रश्न)

दिनांक 20/06/2017

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( सचिवालय )

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमुद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | मा. सदस्यांचे नांव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| 4. | 4 | श्री. विजय (पिंटू) शंकरराव झलके | |

| अनु क्र० | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1. | स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत एल. ॲन्ड. टी या कंपनीद्वारे सुरु असलेल्या कामाबाबद कंपनीने उमरेड रोड खोदण्याची परवानगी एन.एच.ए.आय. या विभागाद्वारे प्राप्त केली आहे काय ? | मे. एल ॲन्ड. टी ने दि. 10.05.2017 ला **एन एचएआय ला परवानगी** मागितलेली आहे. तसेच कार्य. अभियंता, स्मार्ट सिटी यांनी सुध्दा दि. 02.05.2017 अन्वये एनएचएआयकडे निवेदन पत्र सादर केले. |
| 2. | स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत एल. ॲन्ड. टी या कंपनीने नेहरु नगर झोन अंतर्गत सुरु असलेल्या विविध वस्त्यांमधील कामाबाबद लोककर्म विभाग नेहरु नगर झोन क्र. 5 यांचे कडुन परवानगी घेतली आहे काय किंवा कसे | होय, मे. एल ॲन्ड. टी ने नेहरूनगर झोन अंतर्गत सुरू असलेल्या कामाकरीता परवानगी मागीतली आहे. |
| 3. | वरील कंपनीद्वारे सुरु असलेल्या विविध कामाचे दुरुस्ती (Restoration) उदा. डांबरी अपेक्षित आहे काय ? असे न केल्यास कंत्राटदारावर मनपाद्वारे दंडात्मक कारवाईची तरतुद आहे काय ? | होय, करारनामामध्ये कंत्राटदाराने व्यवस्थित काम न केल्यास दंडाची तरतुद आहे. |
| 4. | उपरोक्त कामाबाबद सदर कंपनीस / कंत्राटदारास मनपा द्वारे किंवा राज्यषासनाद्वारे ठरवुन दिलेली कालमर्यादा किती ? | या कामाची कालमर्यादा 12 महिण्याची आहे. |

हस्ता/– निगम आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

egkuxjikfydk loZlk/kkj.k lHkk ¼fo"k; if=dsoj u ?ksrysys iz'u½

fnukad 20@06@2017

# dk;kZy; ukxiwj egkuxjikfydk] ukxiwj

## ( सचिवालय )

egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;ekrhy dye 44 varxZr ek- lnL;kuh iz'kklukdMs fopkjysyk iz'u [kkyhy izek.ks uewn vlwu R;kpk xks"kokjk iq<hy izek.ks-

<table>
<tr><th>v-Ø-</th><th>iz'u Øekad</th><th>ek- lnL;kps uko</th><th>iz'ukps mRrj</th></tr>
<tr><td>5.</td><td>5</td><td>श्री. रमेश गणपती पुणेकर</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>०१</td><td>ओ.सी.डब्ल्यू. कंपनीने महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रातील प्रत्येक प्रभागातील वसाहतींना २४ तास पाण्याचे वितरण करण्याची जबाबदारी स्विकारली असून प्रभाग क्र. २० येथील बारसे नगर, शोभा खेत, गोंड पूरा, लाड पूरा, कुंभारपूरा, स्वामी नगर, ठक्कर ग्राम (मोचीपूरा) चंद्रभागानगर (मोचीपूरा), दारव्हेकर दंगल व विनकर कॉलोनी (नवशक्ती विज्ञालय परिसर) या वसाहतीत ओ.सी. डब्ल्यू. कंपनीकडून एक दिवसाआड सुमारे अर्धा तास पिण्याच्या पाण्याचे वितरण कमी दाबाने करण्यांत येते. हे कोणत्या नियोजन पध्दतीने करण्यांत येते. किंवा वैमनस्यांची भावना ठेवून हा प्रकार घडत आहे. या करिता दोशी कोण ? याबाबतची सविस्तर माहिती देण्यांत यावी.</td><td>प्रभाग क्र. 20 येथील बारसेनगर, शोभाखेत, गोंडपूरा, लाडपुरा, कुंभारपुरा, स्वामी नगर, ठक्करग्राम(मोचिपुरा) दारवेकर दंगल व वीनकर कॉलोनी (नवशक्ती विद्यालय परिसर) हा भागात सध्या इंदोरा (DT) वरुन पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>सध्या या भागात एक दिवसा आड पाणीपुरवठा असुन खालीलप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>१. बारसेनगर, गोंडपुरा, स्वामीनगर, दारवेकर दंगल, ठक्करग्राम,(मोचिपुरा)– इत्यादी भागात एक दिवसआड ४ तास पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>२. कुंभारपुरा– या भागात एक दिवस आड ३ तास पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>३. शोभाखेत, चंद्रभागानगर (मोचीपुरा)– या भागात एक दिवस आड २ तास पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>४. लाडपुरा, विणकर कॉलोनी (नवशक्ती शाळा परिसर)– या भागात एक दिवस आड १ तास पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>सर्दहु भागात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यामध्ये विभागाची वयमनस्याची कोणतीही भावना नाही.<br>मध्यंतरी केन्द्र व राज्य शासनाकडुन नागपूर शहर २४x७ योजनेकरिता अनुदान अप्राप्त असल्याने Capex अंतर्गतचे कामे पूर्ण करता आले नाहीत. मात्र राज्य शासनाकडुन सध्या अनुदान प्राप्त झाले असल्याने Capex ची कामे हाती घेण्यात येणार आहे. व या अंतर्गत बोरियापुरा फिडर मेन ची कामे जुलै २०१७ पासुन सुरु करुन १४ ऑगष्ट् २०१७ पर्यंत पुर्ण करण्यात येतील, व या नंतर डिस्ट्रीबुशन व घरगुती नळ कनेक्शनची कामे हाती घेण्यात येतील. हि काम केल्यानंतर बारसेनगर, शोभाखेत, गोंडपूरा, या संपुर्ण भागात दररोज सुरळीतपणे पाणीपुरवठा करता येईल.<br>त्याचप्रमाणे OCWPL यांनी सादर केलेल्या सध्याचे नियोजनानूसार बस्तरवारी २(B) ESR या कमांड एरियाची Capex ची कामे ऑक्टोबर २०१७ पासून सुरू करून जोनवारी २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येतील. यातील कामे पुर्ण झाल्यावर लाडपुरा, कुंभारपुरा, स्वामी नगर, ठक्करग्राम,(मोचिपुरा) दारवेकर दंगल व वीनकर कॉलोनी (नवशक्ती विद्यालय परिसर) या भागात दररोज सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्यात येईल.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

gLrk@& fuxe vk;qDr
egkuxjikfydk] ukxiwj